Estd: 1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF – 28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

जा.क्र./समाजशास्त्र वि./ /  दिनांक: २१/११/२०१७

प्रति,

मा. अधिविभागप्रमुख
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर

प्राचार्य/संचालक,
सलग्न महाविद्यालये/मान्याताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हपूर

**विषयः– घोषवाक्य (Slogan) स्पर्धेबाबत.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाचे मा. कुलगुरु, देवानंद शिंदे यांच्या पुढाकारातुन शिवाजी विद्यापीठामध्ये प्रथमच **"बेटी बचाओ अभियान"** राबविण्यात येत आहे, तसेच सदर अभियान अंतर्गत सन २०१७–१८ मध्ये प्रथमच **"बेटी बचाओ, बेटी पढाओ"** या विषयावर घोषवाक्य स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. तरी त्यामध्ये आपल्या विभागातील/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.

**पारितोषिक–**

- प्रथम क्रमांक : रु. ७,००/– व स्मृतिचिन्ह
- द्वितिय क्रमांक : रु. ५,००/– व स्मृतिचिन्ह
- तृतीय क्रमांक : रु. ३,००/– व स्मृतिचिन्ह

**स्पर्धेच्या स्वरुप व अटी :**

- सदरच्या स्पर्धेसाठी प्रवेश विनामुल्य राहील.
- घोषवाक्य मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेतच असावेत.
- प्रवेश पत्रिकेचे स्वरुप सोबत जोडलेले आहे. विद्यापीठ अधिविभागातील इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्रिका को–या कागदावर नमुन्याप्रमाणे भरुन (घोषवाक्यासह) समाजशास्त्र अधिविभाग कार्यालयात ठेवणेत येणा–या सिलबंद बॉक्स मध्ये १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत टाकावयाची आहे.

- सर्व संलग्न महाविद्यालये/मान्याताप्राप्त संस्थेतील इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश पत्रिका को–या कागदावर नमुन्याप्रमाणे भरुन (घोषवाक्यासह) समाजशास्त्र अधिविभाग कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–४१६००४ या पत्यावर १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत पाठविण्यात याव्यात.
- घोषवाक्य स्पर्धेत सहभागी स्पर्धकानेच तयार केलेले असावे.
- एका स्पर्धकांचे जास्तीतजास्त दोन घोषवाक्य स्विकारले जातील.
- घोषवाक्य इंटरनेट वरील नसावे.
- तज्ञांनी परीक्षन करुन ठरविलेले पहिले दहा घोषवाक्य शिवाजी विद्यापीठाकडुन छापण्यात येणा–या डिजिटल पोस्टर्सवर प्रदर्शित करण्यात येतील. परंतु पारितोषिक फक्त प्रथम तीन क्रमांकाच्या घोषवाक्यांना देण्यात येईल व उर्वरित सात घोषवाक्यांना स्मृतिचिन्ह भेट देण्यात येईल.
- स्पर्धेत सहभागी होणा–या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.
- सदर स्पर्धेमध्ये कोणत्याही शाखेचा विद्यार्थी सहभागी होवू शकतो.
- प्रत्येक स्पर्धकाची एकच प्रवेशिका ग्राहय धरण्यात येईल.
- सदर स्पर्धेचा निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित कर–यात येईल.
- बक्षिस वितरण समारंभ 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' ०८ मार्च, २०१८ रोजी आयोजित करण्यात येईल.
- स्पर्धेतील घोषवाक्यांचे परिक्षण नियुक्त तज्ञांकडुन केले जाईल व परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल.
- सदर स्पर्धेचे सर्व हक्क समन्वयकाकंडे राखून ठेवणेत येत आहेत.

समन्वयिका
(डॉ. प्रतिभा देसाई)
बेटी बचाओ अभियान

**संपर्कः ९५५२५१७२४९**
**विभाग– ०२३१२६०९२३९**

# प्रवेशिकेचा नमुना

- स्पर्धकाचे नावः.................................................................................................
- अधिविभागाचे नावः.................................................................................................
- शिकत असलेला वर्गः.................................................................................................
- EmailID:..................................................................................................
- मोबाईल नंबरः.................................................................................................
- घोषवाक्यः.................................................................................................

   .................................................................................................

विभागप्रमुख/प्राचार्य                                        स्पर्धकाची सही

सही व शिक्का